REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख ८ मे, १९४० | अंक १९

लेखक—अत्रे.

आचार्य

दिग्दर्शक-विनायक

(वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. चे (खास व्यवस्थेखालील) पुणें मिनव्हर्रा पुणें-फोन ३९८ २ रा आठवडा

लेखक—आचार्य अत्रे, दिग्दर्शक—विनायक, छायालेखक—पांडुरंग नाईक.
भूमिकाः—विनायक, लीला चिटणीस, मीनाक्षी, साळवी, मालवणकर, सौ. वसिष्ठ, कु. देशपांडे, आणि बाबुराव पेंढारकर

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए., कँटब, बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें. S एजन्सीकरितां आजच लिहा. S हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.

पूर्ण स्वदेशी,
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

# विविध माहिती

### कराचीमध्यें जपानी कॉन्सल

कराची येथें जपान सरकारचा प्रतिनिधि ( कॉन्सल ) नेमण्यांत आला आहे.

### बाल्कन राष्ट्रें

युरोपांतील बाल्कन राष्ट्रांतील राजकीय व आर्थिक परिस्थितीस प्रस्तुत युद्धामुळें विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. ह्या राष्ट्रांत बल्गेरिया सर्वांत लहान आहे. त्याची लोकसंख्या ६५ लक्ष आहे. युगोस्लाव्हियाची लोकसंख्या दीड कोटि व रुमानियाची दोन कोटि आहे.

### वृत्तपत्रीय बातम्या

त्यांच्याकडे येणाऱ्या बातम्यांत सत्यांश किती आहे हें समजण्याची वृत्तपत्रांस अलीकडे अडचण भासत आहे. ह्यावर एका अमेरिकन वृत्तपत्रानें तोडगा काढला आहे. प्रत्येक बातमीच्या खालीं एक सूचक अक्षर त्यामध्यें जोडण्यांत येतें. 'प्रचार' 'प्रचारासारखें दिसतें,' 'खरें वाटतें' व 'अधिकृत' ह्यांपैकीं योग्य वाटणारी सूचना ह्या अक्षरानें करण्यांत येते.

### अंड्यांची प्रतवारी

मुंबई प्रांतांत अंड्यांची प्रतवार विक्रीची व्यवस्था पांच सहा ठिकाणीं करण्यांत आली आहे. प्रतवारीच्या पद्धतीमुळें चांगल्या दर्जाच्या अंड्यांस किफायतशीर भाव मिळतो आणि कोंबड्यांच्या संवर्धनास उत्तेजन प्राप्त होतें.

### डेन्मार्कची सहकारी संघटना टिकणार काय ?

डेन्मार्क हा देश तेथील शेतीच्या धंद्याच्या विविध व्यवसायांच्या उत्कृष्ट सहकारी संघटना संबंधानें सर्व जगास आदर्शभूत झालेला आहे. तो आतां जर्मनीच्या सत्तेखालीं गेल्या कारणानें तेथील सहकारी संस्थांचा नाश झाल्यावांचून रहाणार नाहीं, ही एक जागतिक हानी आहे असें म्हटलें पाहिजे. जर्मन सहकारी संस्थांचें स्वातंत्र्य नात्सी सत्ताधाऱ्यांनीं नष्ट करून टाकलें आहे. डॅनिश सहकाऱ्यांची स्थिति ताच होणार हें सांगावयास नको. जिंकलेला देश पिळून काढण्याचें जर्मनीचें धोरण डेन्मार्कला चांगलेंच भोंवणार यांत शंका नाहीं.

### रेडिओची वाढती लोकप्रियता

हिंदुस्थानांतील रेडिओ यंत्रांच्या परवान्यांची संख्या १९३९-४० ह्या वर्षांत २५,२३५ नीं वाढून गेल्या मार्च अखेर ९७,५१७ इतकी झाली. ह्या सालीं रेडिओ यंत्रांच्या आयातीवरील जकातीचें उत्पन्न २१ लक्ष, १९ हजार रुपये झालें. १९३८-३९ मधल्या ह्या उत्पन्नाचा आकडा १४ लक्ष, ८७ हजार रुपये होता. रेडिओच्या वाढत्या लोकप्रियतेची वरील आकडे साक्ष देतात.

### पुणें शहर म्युनिसिपालिटीची सुधारणा समिति

आपला कारभार, कर व्यवस्था, जनतेच्या सोयींविषयीं तजवीज इत्यादि बाबतींत कोणत्या सुधारणा करणें इष्ट व व्यवहार्य आहे ह्याचा विचार करण्यासाठीं पुणें शहर म्युनिसिपालिटीनें एक तज्ज्ञ-समिति नेमली आहे आणि तिचें माहिती गोळा करण्याचें काम चालू आहे. नागरिकांनीं सूचनांच्या द्वारें आपणास सहाय्य द्यावें अशी समितीची विनंति आहे आणि ह्याकरितां तिनें एक प्रश्नमालिका प्रसिद्ध केली आहे.

### मुंबईच्या "क्लिअरिंग हाऊस" चे आकडे

बँकांच्या परस्परांवरील चेक्सची वजावाट करणाऱ्या मुंबई येथील क्लिअरिंग हाऊसमध्यें २६ एप्रिल रोजीं पुऱ्या झालेल्या आठवड्यांत १ लक्ष, २ हजार चेक्सचा निकाल लावण्यांत आला. त्यांतील रकमांची एकूण बेरीज १६ कोटि, ७१ लक्ष रुपये भरली.

### कागदाच्या ऐवजीं स्लेटपाट्या

सध्याच्या युद्ध परिस्थितींत कागदाचा खर्च वांचावा म्हणून सिंधच्या मुख्य विद्याधिकाऱ्यांनीं असें सुचवलें आहे कीं, शिक्षकांनीं विद्यार्थ्यांस कागदाच्या वह्यांचे ऐवजीं स्लेटपाट्या वापरण्यास सांगावें.

### ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १ रु. ४ आ. ३ पै व्याज

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलांचीं २ कोटि रुपयांचीं टेंडरें स्वीकारण्यांत आलीं. त्यांवर द. सा. द. शे. १ रु. ४ आ. ३ पै इतका व्याजाचा दर पडला.

### नॅशनल स्टूडिओज लि.

नॅशनल स्टूडिओज लि. ह्या नवीन चित्रपट कंपनीची सर्व साधारण सभा नुकतीच भरली होती. कंपनीच्या पहिल्या पांच महिन्यांत तिला नफा होणें अर्थातच शक्य नव्हतें. सुमारें ३३ हजार रु. इतका तोटाच तिला ह्या मुदतींत झाला. कच्ची फिल्म मिळण्याची अडचण युद्धामुळें उत्पन्न झाली असल्याचें अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत सांगितलें, तथापि चित्रपटांचा कार्यक्रम समाधानकारक रीतीनें चालला असल्याविषयीं त्यांनीं आश्वासन दिलें.

### आयात-जकातींसाठीं मालाच्या किंमतीचा फेरविचार

आयात जकातींची आकारणी करण्यासाठीं विशिष्ट मालाच्या किंमतींचा दरवर्षीं नोव्हेंबर महिन्यांत फेरविचार हिंदुस्थान सरकारचे अधिकारी करीत असतात. युद्धामुळें यंदा किंमती चढल्या असल्यानें हा विचार नेहमींपेक्षा लवकरच होणार आहे. आणि त्याचें काम चालूहि झालें आहे.

### मुंबई सरकारचें पुण्यांत ठाणें

मुंबई सरकारचें ठाणें मुंबईहून पुण्यास तारीख ३ जून रोजीं हलेल.

### तीस लाख रुपयांचें बक्षीस

हिटलरला पकडून राष्ट्रसंघाच्या स्वाधीन करणारास तीस लक्ष रुपयांचें बक्षीस एका अमेरिकन गृहस्थानें लावलें आहे. बक्षिसाची मुदत चालू मे महिना अखेर आहे.

### फडनवीसांची परिषद भरत नाहीं

प्रांतिक फडनवीसांची परिषद् सिमला येथें भरण्याविषयींच्या बातमींत कांहीं तथ्य नाहीं. सद्यः परिस्थितींत असली परिषद् भरवली जाणार नाहीं असें आतां प्रसिद्ध झालें आहे.

### नॉर्वेचा चौथा नंबर

व्यापारी जहाजांच्या मालकीचे बाबतीत नॉर्वेचा सर्व जगांत चौथा नंबर लागतो. नॉर्वेचा स्वतःचा व्यापार जागतिक व्यापाराच्या १ टक्क्याइतकाच काय तो आहे, पण त्याचीं जहाजें जगांतील एकूण जहाजांच्या ७ टक्क्यांइतकीं आहेत.

### सरकारी नोकरांस महागाई भत्ता

हलक्या पगाराच्या सरकारी नोकरांस महागाई भत्ता कसा व किती द्यावा ह्याचा विचार मध्यवर्ती व प्रांतिक सरकार ह्यांचे मध्यें चालला आहे. किंमती सध्याच्या मानानें विशेष चढल्यास सर्व प्रांतांच्या विचारानें एक धोरण निश्चित व्हावें असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती .... २१८
२ डॉलर, पौंड व रुपया ह्यांचें एक गौडबंगाल ... २१९
३ हिंदुस्थानाची सासर इंग्लंडनें घेतली पाहिजे २२०
४ कामगारांसाठीं शिक्षण व करमणूक ... २२१
५ स्फुट विचार ... २२१
युद्ध, घपत आणि विमा–प्राथमिक शाळांतील अभ्यासक्रम–आर्थिक योजना समितीचें कार्य–अँग्लो रशियन व्यापारी करार–जर्मनीची नाकेबंदी—बाल्कन्स आणि भूमध्य समुद्र
६ इंडियन मो. इं. कं. लि. २२३
७ आरोग्य मंडळ ... २२३
८ मुंबई प्रांताचें आरोग्य २२४
९ तळवडें को. के. सोसायटी २२५
१० होळकर स्टेट सहकारी परिषद ... ... २२५
११ युद्धांतील आरोग्यविषयक कार्य ... ... २२५
१२ निवडक बाजारभाव २२६



# अर्थ

बुधवार, ता. ८ मे, १९४०


## डॉलर, पौंड व रुपाया ह्यांचें एक गौडबंगाल

### डॉलरमध्यें पौंडाचे दोन दर

कापसाचा मोठ्या प्रमाणावर व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांचें ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशन या नांवाचें मध्यवर्ती मंडळ आहे. कापसाच्या खरेदी-विक्रीच्या सवदांचें नियमन करणें आणि कापसाच्या धंद्याशीं संबंध असलेल्या लोकांच्या हितसंबंधाचें संरक्षण करणें हे त्याचे मुख्य उद्देश आहेत. हिंदी हुंडणावळीच्या व्यवस्थेच्या बाबतींत ह्या असोसिएशननें रिझर्व्ह बँकेकडे तक्रार केली असून त्या संबंधांतला कांहीं पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला आहे. कॉटन असोसिएशनची मुख्य तक्रार ही आहे कीं ब्रिटिश पौंडाच्या अमेरिकन हुंडणावळीचा दर बँक ऑफ इंग्लंडनें निश्चित केला असला आणि त्या संबंधांतल्या व्यवहारांचें नियंत्रण चालवलें असलें तरी त्यापेक्षा हलक्या भावानें अमेरिकन बाजारांत सवदे होतात. हिंदी रुपयाची किंमत ब्रिटिश पौंडास जोडलेली आहे ह्या कारणानें येथील कच्च्या मालास बँक ऑफ इंग्लंडच्या स्टर्लिंग-डॉलर हुंडणावळीच्या दरानें किंमत मिळते, पण हिंदुस्थानांत कापूस वगैरे माल पाठवणाऱ्या परदेशी व्यापाऱ्यांस हलक्या दराचा फायदा घेतां येतो. ह्या रीतीनें पौंड-डॉलर हुंडणावळीचे एकाच वेळीं अधिकृत व अनधिकृत असे दोन दर झाल्यानें घोटाळा माजून हिंदुस्थानच्या निर्गत–आयात व्यापारांत निर्गतीस प्रतिकूल आणि आयातीस अनुकूल अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. युद्धकाळची व्यवस्था म्हणून इंग्लंडनें व हिंदुस्थानच्या मध्यवर्ती बँकेनें परराष्ट्रीय हुंड्यांच्या व्यवहारांचें नियंत्रण करणें अगत्याचें असलें तरी परदेशी व्यापाऱ्यांचा फायदा आणि हिंदी व्यापाऱ्यांचें नुकसान त्याच्यामध्यें होणार नाहीं ह्या विषयीं खबरदारी घेतली गेली पाहिजे, असें ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनचें म्हणणें आहे.

असोसिएशनच्या पत्रास उत्तर देतांना स्टर्लिंग-डॉलर हुंडणावळीच्या दुहेरी दराची भानगड कशी उपस्थित झाली ह्याचें दिग्दर्शन रिझर्व्ह बँकेनें केलें आहे. युद्ध चालू होतांच बँक ऑफ इंग्लंडनें सोन्यावर आधारलेल्या परराष्ट्रीय चलनांचे हुंडणावळीचे दर ठरवून टाकले. ह्या दरांच्या मर्यादेबाहेर व्यवहार होऊं नयेत असा नियम रिझर्व्ह बँकेनें डिफेन्स ऑफ इंडिया नियमांच्या आधारानें केला. युद्धाच्या दृष्टीनें महत्त्वाचा नाहीं अशा मालाचे बाबतींत ठरलेल्या स्टर्लिंग (पौंड)–डॉलर दरानें हुंड्यांचे पैसे देण्या-घेण्याचें बँक ऑफ इंग्लंडनें नाकारलें. सुमारें ४ डॉलर्सना १ पौंड ह्या दराची हुंडणावळ इंग्लंडला माल पाठवणारांस मिळेनाशी झाली आणि त्यांस मिळेल तो भाव स्टर्लिंगमध्यें स्वीकारावा लागला. न्यूयॉर्कच्या बाजारांत अशा हुंड्यांची देवघेव चालू झाली आणि तेथील हुंडणावळीचा दर ३½ डॉलर्स = १ पौंड इतका खालीं गेला. हिंदी मालाची आयात करणाऱ्या परदेशी व्यापाऱ्यांस हा दर सोयीचा पडून त्यांनीं स्टर्लिंगमधील हुंड्यांचे त्या दरानें व्यवहार केले. ह्याचा परिणाम असा झाला कीं, हिंदी मालास नियंत्रित दरानें किंमत मिळेनाशी झाली आणि आयात मालाचे पैसे एका पौंडास ४०२ सेंट्स ह्या दरानें द्यावयाचे व निर्गत मालाचे पैसे एका पौंडास ३५० सेंट्स ह्या दरानें घ्यावयाचे अशी परिस्थिति निर्माण झाली. ह्या देवघेवींत १२ टक्क्यांचा फायदा परदेशी व्यापाऱ्यांस होऊन तें नुकसान हिंदी व्यापाऱ्यांस सोसावें लागलें आहे ही गोष्ट रिझर्व्ह बँकेसहि नाकारतां आलेली नाहीं. बँक ऑफ इंग्लंडनें हुंडणावळीचें आपलें नियंत्रण घट्ट करण्यासाठी गेल्या मार्चमध्यें नवीन नियम करून तो विशिष्ट जातींच्या मालास लागू केला. तथापि, कापसाचा अंतर्भाव ह्या नियमनाच्या कक्षेंत झाला नसल्यानें अमेरिकन व्यापाऱ्यांस कापूस खुल्या बाजारांतील हुंडणावळीच्या फायदेशीर दरानें मिळणें शक्य झालें. परंतु हा खुला बाजार अत्यंत-मर्यादित आहे आणि एकूण हुंडी व्यवहारांच्या मानानें त्यांत होणारे व्यवहार एक-दशांशहि नाहींत असें समाधान करण्याचा रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न आहे.

अनियंत्रित बाजारांत न्यूयॉर्कमध्यें अमेरिकन व्यापाऱ्यांस स्वस्त भावानें स्टर्लिंगमधली हुंडी मिळून तिच्या द्वारें ते हिंदी कापसाच्या खरेदीचे पैसे चुकते करतात, आणि ह्या व्यवहारांत त्यांस १२ टक्क्यांचा फायदा मिळतो तो बंद करण्याची व्यवस्था होत असल्याचें आश्वासन आतां रिझर्व्ह बँकेनें दिलें आहे. परंतु ह्या १२ टक्क्यांच्या तफावतीइतका नुकसानीचा बोजा कापूस पिकवणाऱ्या हिंदी शेतकऱ्यावर पडतो हें म्हणणें तिनें अमान्य केलें आहे. न्यूयॉर्कहून बाहेर जाणाऱ्या कापसाची किंमत १ पौंड = ४ डॉलर ह्या दरानेंच दिली जाते व ह्या नियमास कांहीं अपवाद असले तरी त्यांपासून होणारा फायदा अल्पकालिक व तात्पुरता आहे असें त्या बँकेचें उत्तर आहे, तें फारसें समाधानकारक आहे असें म्हणतां येणार नाहीं. स्टर्लिंगच्या किंमतींत घट झाली आहे, रुपयाच्या किंमतींत नाहीं, असें म्हणून रिझर्व्ह बँकेनें असें प्रतिपादलें आहे कीं, १२ टक्क्यांच्या हुंडणावळींतल्या फरकाचा फायदा बँक ऑफ इंग्लंडला मिळत नसून अमेरिकेंतील खरेदीदारास मिळतो. तथापि, हिंदी मालास जेवढी किंमत मिळाली पाहिजे तेवढी मिळत नाहीं, ह्या तक्रारीस जागा आहे ही गोष्ट शिल्लक रहाते आणि ती रिझर्व्ह बँकेस नाकारतां आली नाहीं.

ब्रिटिश सरकार आणि बँक ऑफ इंग्लंड ह्यांनीं स्टर्लिंग-डॉलर हुंडणावळीचे दोन निरनिराळे दर, एक नियंत्रित व अधिकृत आणि दुसरा अनियंत्रित व खुल्या बाजारांतला, एकाच वेळीं चालू देणें इष्ट आहे कीं काय ह्या प्रश्नाची चर्चा इंग्लंडमध्यें झाली

आहे आणि होत आहे. त्यावर तीव्र मतभेद उपस्थित झाल्या-कारणानें ब्रिटिश फडनवीसांस आपल्या धोरणाचें समर्थन कॉमन्स सभेंत करावें लागलें आहे. हुंडणावळीच्या मर्यादित प्रमाणांतला खुला बाजार अनियंत्रित राहूं देण्यास हरकत नाहीं आणि तें इष्टहि आहे असें त्यांचें म्हणणें आहे. परंतु हें धोरण हिंदी व्यापा-रास बाधक होत असेल तर ह्या देशापुरतें तें बदलून घेणें हिंदुस्थान सरकार आणि रिझर्व्ह बँक ह्यांच कर्तव्य आहे. रिझर्व्ह बँक हिंदुस्थानच्या आयात–निर्गत व्यापारांतील हुंडणावळींच्या व्यव-हारांचें नियंत्रण करीत आहे, पण बँक ऑफ इंग्लंडचें नियंत्रण क्षेत्र असें सर्वव्यापी नाहीं. हिंदी रुपया ब्रिटिश स्टर्लिंगला जोडलेला असतांना न्यूयॉर्कच्या खुल्या हुंडीबाजारांत त्यांचा दुवा निस-टला आहे, ह्याचा अर्थ ब्रिटिश साम्राज्याबाहेरील देशांत हिंदी चलन ब्रिटिश चलनावर आधारलेलें नाहीं असा होतो ह्या ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या म्हणण्यांत पुष्कळ तथ्य आहे. इंग्लंड व फ्रान्स ह्यांच्यांशीं होणाऱ्या हिंदी व्यापारांत एका किंम-तीचा रुपया आणि ब्रिटिश साम्राज्याबाहेरील देशांच्या व्यवहा-रांत दुसऱ्याच किंमतीचा रुपया अशी आज परिस्थिति असल्याचें असोसिएशननें निदर्शनास आणलें आहे. त्याचा विचार रिझर्व्ह बँक व हिंदुस्थान सरकार ह्यांनीं करणें आवश्यक आहे.

---

## हिंदुस्थानाची साखर इंग्लंडनें घेतली पाहिजे.

हिंदी स्वदेशी साखरेच्या धंद्याची आतां झपाट्यानें प्रगति झाली असून त्यांतला साखरेचा पुरवठा ह्या देशांतील लोकांची गरज भागवून शिल्लक राहील एवढा मोठा झाला आहे. ही प्रगति देशी साखरेस जकातीचें संरक्षण देण्यांत आलें आहे त्यामुळें घडून आली आहे, ह्यांत शंका नाहीं. त्या धंद्यांत गुंतलेलें हिंदी भांडवल, त्यांत हजारों सुशिक्षित-अशिक्षित लोकांस मिळ-णारें काम, त्यायोगानें खेडेगावी भागांत लोकांस उद्योग लागून त्या-योगानें त्यांच्या हातांत खेळणारा पैसा इत्यादि गोष्टी पाहिल्या म्हणजे स्वदेशी साखरेस देण्यांत आलेल्या संरक्षणाचें चीज झालें आहे असें म्हणावें लागतें. संरक्षणामुळें जावाच्या साखरेची आयात अत्यंत मर्यादित झाली आहे आणि सरकारचें जकातीचें उत्पन्न संपुष्टांत आलें आहे हें खरें असलें तरी स्वदेशी साखर-कारखान्यां-कडून सरकारास कराची भरपाई अन्य मार्गांनीं होत आहे, हें विस-रून चालावयाचें नाहीं. स्वदेशी साखरेच्या उत्पादनावर खास पट्टी बसवण्यांत आली असून प्रातीवरील कराचेंहि उत्पन्न तिच्यापासून सरकारास मिळतें. आर्थिक उन्नतीस ह्या धंद्यानें जोराची चालना दिली असून तिच्यामध्यें समाजाचे सर्व घटक, विशेषतः शेत-कीशीं संबंध असलेली खेडेगावी जनता, अंशभागी आहे हा स्वदेशी साखरेच्या प्रगतीचा मुख्य राष्ट्रीय फायदा आहे.

साखरेचा व्यापार करणाऱ्या लोकांशीं संबंध असलेल्या आंतर-राष्ट्रीय समितीनें तीन वर्षांमागें जागतिक साखरेची वाटणी निर-निराळ्या देशांत विशिष्ट प्रमाणांत व्हावी असें ठरवलें आणि तिला ब्रिटिश व इतर सरकारांनीं मान्यता दिली. ह्या व्यवस्थेंत हिंदु-स्थानची साखर परदेशांत विकण्यास प्रतिबंध करण्यांत आला. त्याविरुद्ध हिंदी लोकमतानें जोराची तक्रार करून हिंदुस्थान सरकारनें ह्या करारास मान्यता देऊं नये असें सुचवलें. परंतु त्या वेळीं ह्या विरोधाचा कांहींच उपयोग झाला नाहीं आणि जाग-तिक बाजारांत हिंदी साखरेस मज्जाव झाला. आतां युद्धानें सर्व परिस्थिति बदलून टाकली आहे आणि पूर्वीच्या हिंदुस्थानास प्रतिकूल असलेल्या करारांत दुरुस्ती करून घेण्याची संधि प्राप्त झाली आहे. ब्रिटिश साम्राज्यांत तयार होणारी साखर घेणें सध्या इंग्लं-डला श्रेयस्कर आहे आणि आपल्या वसाहतींत साखरेचें उत्पादन वाढावें असा इंग्लंडचा प्रयत्न आहे. युद्धाच्या परिस्थितींत साख-रेच्या पुरवठ्याचे बाबतींत दोस्त राष्ट्रांस सर्वस्वी स्वावलंबी होणें इष्ट व अगत्याचें आहे. आंतरराष्ट्रीय साखरसमितीची योजना सद्यःस्थितींत अव्यवहार्यहि आहे. तिच्याशीं संबंध असलेलीं कांहीं राष्ट्रें परस्पर शत्रू बनलीं आहेत. तसेंच, इंग्लंडनें साखर घ्यावयाची ती ब्रिटिश चलनाशी व हुंडणावळीशी संलग्न अस-लेल्या देशांतून घेणें त्या राष्ट्रास सोयीचें व हितावह आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां इंग्लंडनें हिंदुस्थानशीं व्यापारी करार करून ठराविक प्रमाणांत येथून स्वदेशी साखर घेतल्यास दोन्ही देशांचें त्यांत हित आहे.

हिंदी व्यापारी संघांच्या मध्यवर्ती मंडळानें ह्या प्रश्नाकडे हिंदु-स्थान सरकार व ब्रिटिश सरकार ह्यांचें लक्ष वेधलें असून वरील आशयाची सूचना त्यांस केली आहे. प्रस्तुत प्रश्नाची पूर्वपीठिका सांगून युद्धपरिस्थितींत हिंदी साखरेचे कारखाने आणि ब्रिटिश सरकार ह्यांस आपली योजना कशी सारखीच उपकारक आहे, ह्याचें स्पष्टीकरण मंडळानें केलें आहे. वेस्ट इंडीज शुगर कंपनीचे अध्यक्ष, सर लिओनार्ड लाइल, ह्यांनीं अलीकडे केलेल्या भाष-णाचा त्यानें आपल्या सूचनेच्या पुष्ट्यर्थ उल्लेख केला आहे. त्या भाषणाचा महत्त्वाचा उतारा असा आहेः–" युद्ध चालू असल्यानें मागची आंतरराष्ट्रीय योजना सध्या गैरलागू झाली आहे. वसाहतींतल्या साखरेच्या उत्पादकांस ब्रिटिश व स्थानिक सरकार आपलें उत्पादन वाढवण्यास उत्तेजन देत आहेत. ह्या उत्पादना-च्या विस्ताराचा उपयोग ब्रिटिश हुंडणावळीस बळकट करण्या-कडे होईल आणि ह्या रीतीनें साम्राज्यांतील साखर युद्धांत मह-त्त्वाची कामगिरी करील ". वसाहतींतलें साखरेचें उत्पादन वाढव-ण्यास उत्तेजन दिलें जात आहे. हिंदी साखर कारखान्यांचें उत्पादनसामर्थ्य आयतेंच अगोदर वाढलेलें असल्यानें त्याचा फायदा ब्रिटिश सरकारास सहज मिळण्यासारखा आहे. हिंदु-स्थान सरकार ब्रिटिश सरकारापुढें हिंदी साखरेची बाजू जोरानें मांडील आणि हिंदी व्यापारी संघाची सूचना मान्य केली जाईल अशी आम्हांस आशा आहे.

---

## कामगारांसाठीं शिक्षण व करमणूक

मुंबई आणि अहमदाबाद् येथील गिरण्यांतील कामगारांचें शिक्षण व करमणूक ह्यांसाठीं ह्या शहरांत कित्येक ठिकाणीं व्यवस्था करण्यांत आली आहे. गेल्या मार्च महिन्यांत मुंबईत संप असूनहि ह्या ठिकाणांतलें कार्य समाधानकारक रीतीनें चाललें होतें. तेथील शाळांत शिकणाऱ्या मुलांमुलींची संख्या वाढत आहे आणि त्यांस उघड्या हवेंतील व बैठे खेळ चांगले आवडूं लागले आहेत. सिनेमा, नाटकें व संगीत ह्यांची सोय करण्यांत आलेली आहे, तिचा फायदा शेकडों स्त्री-पुरुष घेत आहेत. डिलाइल रोड-वरील दवाखान्यांत औषध घेण्यास येणारांची संख्या वाढली आहे. अहमदाबादमध्यें अशीच प्रगति होत आहे. तेथें रेडिओ अधिकाधिक प्रिय होत आहे. वाचनालय आणि शाळा येथें जाणारांची संख्या वाढत्या प्रमाणांत आहे.

## स्फुट विचार

### युद्ध, बचत आणि विमा

युद्ध चालू असतांना त्याच्या खर्चासाठी सरकारास लागणारा पैसा जनतेच्या बचतीमधून कर व कर्ज ह्यांच्या स्वरूपांतच त्यास मिळणें शक्य व इष्ट आहे. लोकांनीं आपला नित्य व नैमित्तिक खर्च हात राखून करावा म्हणजे त्यांची क्रयशक्ति मर्यादित होऊन शिल्लक उरेल ती सरकारास युद्धोपयोगी जिन्नस बनवण्यास व विकत घेण्यास उपयोगी पडणारी आहे. ब्रिटिश जनतेमध्यें ह्या आशयाचा प्रचार चालला असून तिनें आपल्या मिळकतींतला अधिकांत अधिक भाग सरकारच्या कामास येईल अशी तजवीज करावी असें सांगण्यांत येत आहे, त्याचें रहस्य ध्यानांत येणें आवश्यक आहे. ब्रिटिश सरकारचे आर्थिक सल्लागार, लॉर्ड स्टँप, ह्यांनीं घरें विकत घेण्यासाठी सभासदांस कर्जाऊ पैसा देणाऱ्या एका संस्थेस उद्देशून नुकतेंच भाषण केलें, त्यांत त्यांनीं सांगितलें कीं, जुनीं घरें विकत घेण्यांत घातलेला पैसा सरकारच्या तिजोरींत जातो. ह्याचा अर्थ असा आहे कीं, नवीं घरें बांधण्यांत निरनिराळ्या प्रकारचा मालमसाला विकत घ्यावा लागतो आणि त्याची स्पर्धा सरकारास आवश्यक असलेल्या मालाशीं होते आणि मजुरीची परिस्थिति तशीच होते. जुन्या घरांच्या खरेदींत जिंदगीची मालकी बदलते, नवीन मालाच्या उत्पादनाचा प्रश्न उद्भवत नाहीं. हाच न्याय विम्याच्या हप्त्यांवर खर्चलेल्या मिळकतीस लागू पडतो. एका ब्रिटिश विमामंडळीच्या अध्यक्षांनीं ही गोष्ट खाली दिलेल्या शब्दांत व्यक्त केली आहे:—" परदेशांतून आणावा लागणारा माल आणि सरकारास युद्धाप्रीत्यर्थ आवश्यक असलेले कामगारांचे श्रम ज्यांत खर्ची पडतात असे जिन्नस विकत घेण्याचें शक्य तितकें करून टाळा. देशांतला मामुली अंतर्गत व्यापार चालू राहील अशा बेतानें इतर जिनसांची खरेदी काटकसरीनें करा. तुमची प्राप्ति कायम राहिली किंवा थोडी वाढली तर तुम्हांस थोडीबहुत बचत करतां येईल. ह्या पैशाचा विनियोग आयुर्विम्याच्या हप्त्यांवर केला गेला तर विमा मंडळी सरकारी कर्जांत अधिक भाग घेईल आणि जनतेचा स्वार्थ व परमार्थ साधेल."

---

### प्राथमिक शाळांतील अभ्यासक्रम

आमच्या इलाख्यांतील प्राथमिक शाळांतील अभ्यासक्रम पंचवीस वर्षांमागें चालू करण्यांत आला, त्यांत ह्या अवधीमध्यें फेरबदल करण्यांत आला नाहीं. पुराणप्रियतेपेक्षा बदलता काळ आणि गरजा ह्यांकडे दुर्लक्षच ह्या गोष्टीस जबाबदार धरलें पाहिजे. प्रचलित शिक्षणक्रम मुलामुलींच्या व समाजाच्या रोजच्या जीवनास धरून नाहीं आणि ह्यामुळें त्याचा व्यावहारिक उपयोग अपेक्षेप्रमाणें होत नाहीं अशी तक्रार बरेच दिवस ऐकूं येत आहे. शिक्षणखात्याच्या कांहीं अधिकाऱ्यांची एक लहान समिति डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शननीं नेमली होती आणि तिनें एक शिक्षणक्रमाचा मसुदा तयार केला. स्थानिक संस्थांच्या स्कूल बोर्डांकडून आलेल्या त्यावरील टीका व सूचना लक्षांत घेऊन शिक्षणखात्यानें सरकारी व बिनसरकारी प्रॅक्टिसिंग स्कूलमध्यें प्रयोगादाखल नवीन शिक्षणक्रम चालू केला. ह्या प्रयोगासंबंधाचा अनुभव समाधानकारक असल्याचा अभिप्राय प्रकट झाल्यामुळें नवीन शिक्षणक्रम सर्व प्राथमिक शाळांत चालू करण्यांत येत आहे. पूर्वीच्या शिक्षणक्रमांत शाळांच्या गरजांप्रमाणें विषयांच्या निवडीस जागा नव्हती आणि ठराविक विषय सर्वांवर सारखे लादण्यांत येत असत. हा दोष आतां दूर करण्यांत आला आहे आणि दुरुस्त केलेल्या शिक्षणक्रमांत ह्या बाबतींत अधिक स्वातंत्र्याची तरतूद आहे. तसेंच शिक्षण अधिक व्यावहारिक व्हावें अशीहि त्यांत योजना आहे. नवीन शिक्षणक्रम सर्व प्राथमिक शाळांत चालू करण्यास मुंबई सरकारनें मान्यता दिली आहे. प्रांताच्या सर्व प्रादेशिक भाषांत तो लवकरच उपलब्ध होईल आणि तो निरनिराळ्या इयत्तांत क्रमाक्रमानें अंमलांत आणला जाईल.

---

### आर्थिक योजना-समितीचें कार्य

विशेषतः काँग्रेसच्या अधिकारांतील प्रधानमंडळाच्या सहायानें नेमलेल्या आर्थिक योजना-समितीचें कार्य पंडित जवाहरलाल ह्यांच्या नेतृत्वाखाली चालू असून त्यांत आतां बरीच प्रगति झाली आहे. ह्या समितीनें निरनिराळ्या महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी अनेक उपसमित्या नेमल्या आहेत आणि त्यांच्या रिपोर्टांची छाननी होऊन मुख्य समितीच्या सूचनांची चर्चा चालू आहे. आतांपर्यंत झालेल्या कामाची रूपरेषा पंडित नेहरू ह्यांनीं दिली आहे आणि त्यांतील मुख्य तत्त्वांचें दिग्दर्शनहि केलें आहे. राष्ट्राची आर्थिक घटना कशी असावी हें ठरवणें आणि त्याचप्रमाणें कृति करणें राजकीय सत्तेच्या हातीं असतें आणि हिंदुस्थानांत तर ही सत्ता योजना करणारांच्या किंवा तिला मूर्त स्वरूप देऊं इच्छिणारांच्या कक्षेच्या बाहेर आहे, असें असलें तरी योजनात्मक धोरण आंखणें पुढें ढकलण्यांत अर्थ नाहीं असें पंडितजींचें म्हणणें आहे. चालू युद्धामुळें जगांत कोणत्या प्रकारचें राजकीय व आर्थिक संघटन प्रस्थापित होईल हें आज सांगतां येत नाहीं. तथापि त्यांनीं ही गोष्ट स्पष्ट केली आहे कीं, हिंदुस्थानांत खरी लोकशाही स्थापन होईल तेव्हांच तिच्या सत्तेखालीच योजण्यांत येणारें आर्थिक धोरण अंमलांत येईल. राष्ट्राची उत्पादनशक्ति वाढून संपत्तीच्या जोरावर कोणत्याहि व्यक्तीस दुसऱ्यांवर आर्थिक जुलूम करतां येणार नाहीं आणि ह्या बाबतींत जनतेचे प्रतिनिधि जें सरकार त्यास आपला अधिकार चालवतां येईल अशी व्यवस्था होण्याची आवश्यकता सर्व विचारी लोकांस पटेल. परंतु रशियन किंवा अन्य छापाची आर्थिक घटना ह्या देशांत स्थापण्याचें मनाशीं अगोदर ठरवून त्याप्रमाणें सूचना करण्याची घाई योजना-समितीनें करूं नये. राष्ट्र ह्या नात्यानें हिंदुस्थानास पचेल आणि रुचेल अशीच आर्थिक रचना बनवणें शहाणपणाचें होईल आणि ती हिंदी बहुमतास पटावीहि लागेल. तिला सांप्रदायिक स्वरूप येतां कामा नये अशी काळजी घेतली जाणें अगत्याचें आहे.

---

### ॲंग्लो-रशियन व्यापारी करार

जर्मनीच्या विरुद्ध चाललेल्या प्रस्तुत युद्धांत दोस्त राष्ट्रांनीं आर्थिक शस्त्रास विशेष महत्त्व दिलें आहे. अनेक वर्षांच्या पूर्वतयारीमुळें शस्त्रास्त्रांचा आणि अन्नवस्त्राचा पुरवठा जर्मनीस कांहीं काळपर्यंत करतां येईल. पण दीर्घकाळपर्यंत युद्ध चालवण्याचें त्याचें सामर्थ्य नष्ट करण्याचा प्रयत्न इंग्लंडला करतां येण्यासारखा असून त्यानें तो चालवलाहि आहे. पश्चिमेच्या बाजूनें समुद्रावरचा व्यापार जर्मनीस करतां येऊं नये असा बंदोबस्त इंग्लंडनें

केला आहे. त्याचप्रमाणें तटस्थ राष्ट्रांच्या मार्फत जर्मनीस बाहेरचा माल पोंहोचूं नये अशीहि व्यवस्था त्यानें केली आहे. जरूरीच्या मालाच्या बाबतींत आपला कोंडमारा ह्या रीतीनें होत आहे ह्याची जाणीव जर्मनीस आहे आणि ह्या नाकेबंदीचा स्वतः-च्या भोंवतालचा कोट फोडण्याची त्याची खटपटहि आहे. कांहीं तटस्थ राष्ट्रांस धाकदपटशाच्या मार्गानें माल पुरवण्यास भाग पाडणें, रशिया व इटली ह्यांच्या गुप्त सहानुभूतीचा फायदा घेणें इत्यादि प्रकार जर्मनीनें चालवले आहेत. ते निष्फळ कसे करतां येतील ह्याकडे इंग्लंड सारखें लक्ष पुरवीत आहे. व्हॅलडिव्होस्टॉक बंदराच्या बाजूस जर्मनीच्या नाकेबंदीच्या तटांमधून कांहीं माल जर्मनीस पोंहोचत असल्याची त्यास माहिती आहे आणि हें द्वार कसें बुजवावें ह्याचा विचार त्यानें चालविला आहे. रशियाशीं व्हावयाच्या व्यापारी करारांत इंग्लंडनें एक कलम घालण्याचें योजिलें होतें, त्याच्या योगानें ब्रिटिश माल किंवा त्याचा मोबदला जर्मनीस मिळूं नये अशी योजना होऊं शकली असती. ज्या राष्ट्रांशीं आपला व्यापार चालला आहे, त्यांकडे माल पाठवण्याचे बाबतींत कोणतेंहि बंधन आपण स्वतःवर घालून घेण्यास तयार नाहीं असें रशियानें इंग्लंडला कळविलें असल्याचें समजतें. अशी अट इंग्लंडनें जर घातली नाहीं तर रशियाशीं होणाऱ्या व्यापाराचा फायदा शत्रूस करून दिला, असेंच घडण्याची निश्चित भीति आहे. रशियाकडून आपणांस मालाचा पुरवठा होईल अशी जर्मनीची पूर्वीपासूनची अपेक्षा आहे. ती फलद्रूप होण्यास व्यापारी करारानें अप्रत्यक्षपणानें सहाय दिल्याची शंकाहि येतां कामा नये अशी इंग्लंडची भूमिका असणें अगदी स्वाभाविक आहे.

---

### जर्मनीची नाकेबंदी

हिटलरशाहीचा पाडाव होणें जागतिक शांतता व राष्ट्रांचें स्वातंत्र्य ह्यांचे दृष्टीनें अगत्याचें आहे असें ज्यांस वाटत आहे, त्या सर्व देशांनीं दोस्त राष्ट्रांशी सहकार्य करून प्रस्तुत युद्धांत जर्मनीस आर्थिक सहाय मिळणार नाहीं अशी तजवीज केली पाहिजे हें ब्रिटिश मुत्सद्यांचें म्हणणें अमेरिकनांसारख्या स्वातंत्र्यप्रेमी लोकांस पटण्यास अडचण पडूं नये. जर्मनीशीं होणाऱ्या निर्गत व्यापाराचे संबंधांत रशियानें दिलेलें उत्तर इंग्लंडमध्यें असमाधानकारक वाटत आहे, ह्यांत नवल नाहीं. परराष्ट्रीय मालाच्या पुरवठ्याबाबत जर्मनीचा कोंडमारा व्हावा म्हणून जागतिक पुरवठा आणि आंतरराष्ट्रीय व्यापार ह्यांवर इंग्लंडनें सक्त नजर ठेवली आहे. तटस्थ राष्ट्रांची निष्कारण गैरसोय होऊं नये, पण जर्मनीस त्यांचे मार्फत माल मिळूं नये, असा दुहेरी हेतु ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाच्या मुळाशीं आहे. तटस्थ राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची पर्वा जर्मनीस कितीशी आहे हें नॉर्वे व डेन्मार्क ह्यांच्याशीं त्याच्या वर्तनानें सिद्ध केलेंच आहे. पोर्तुगाल व स्पेन ह्यांच्या बाजूनें व्यापारी विमानांतून जर्मनीस अटलांटिक महासागराच्या बाजूचा माल मिळत आहे, त्यास बंदी करणें आवश्यक असल्याचें कॉमन्स सभेंत नुकतेंच सांगण्यांत आलें. ह्यावरून जर्मनीच्या आर्थिक नाकेबंदींत गळती कशी आहे आणि ती पूर्णपणें नाहींशीं करणें सोपें नाहीं ह्याची कल्पना येते.

---

### बाल्कन्स आणि भूमध्यसमुद्र

बाल्कन्समधील राष्ट्रांशीं कुरापत काढून तेथें गडबड उडवून देण्याचा बेत जर्मनीनें केला असल्याचीं चिन्हें गेल्या आठवड्यांत दिसत होतीं. इटलीचें युद्धविषयक धोरण हा या बाजूच्या आंतरराष्ट्रीय राजकारणांत अत्यंत महत्त्वाचा प्रश्न गेले कित्येक महिने होऊन बसला आहे. बाल्कन्स आणि भूमध्यसमुद्र ह्या बाजूस युद्धक्षेत्राचा विस्तार करून तिकडून दोस्त राष्ट्रांस शह द्यावा असा हिटलरचा बेत असणें अगदी स्वाभाविक आहे. युगोस्लाव्हिया, रुमानिया इत्यादि देशांत ह्या संबंधांत अस्वस्थता माजून राहिलेली आहे. बाल्कन्समध्यें आपले खास हितसंबंध निगडित झालेले आहेत, असें इटली पूर्वीपासून म्हणत असल्यानें मुसोलिनीच्या संगनमतानें तिकडील धोरण आखणें हिटलरला प्राप्त आहे. तसेंच, बाल्कन्समधील हालचालींसंबंधानें रशिया अगदी तटस्थ राहील असें नाहीं. ही परिस्थिति दोस्त राष्ट्रें पूर्णपणें जाणून आहेत, हें जर्मनी व इटली ह्यांस पक्कें माहित आहे. इटालियन वृत्तपत्रें व पुढारी ह्यांचे प्रस्तुत युद्धाचे बाबतींतले उद्गार बहुतेक धमकीवजाच असतात. शेजारीं युद्धाचा वणवा पेटला असतां इटलीस स्वस्थ बसतां येत नाहीं असें एकदां म्हणावयाचें. दुसऱ्या प्रसंगीं फ्रान्स व इंग्लंड यांचे धोरणाविरुद्ध तक्रार करावयाची. भूमध्यसमुद्रांत इंग्लंडची लुडबूड आम्हांस नको असें मधून मधून बोलून दाखवावयाचें, कित्येक वेळां जर्मनीची स्तुति करून आपल्या त्या राष्ट्राविषयींच्या आपुलकीचें प्रदर्शन करावयाचें, कधीं कधीं रशियन बोल्शेव्हिकांविरुद्ध उद्गार काढावयाचे असला त्यांचा खेळ सारखा चाललेला आहे. ह्या कारणानें इंग्लंडला भूमध्यसमुद्रांत अत्यंत सावधगिरीनें वागून येईल त्या प्रसंगास तोंड देण्याची तयारी ठेवणें प्राप्त झालें आहे. आपल्या व्यापारी जहाजांची भूमध्यसमुद्रांतली वहातूक इंग्लंडनें बंद ठेवली असून, ती केप ऑफ गुड होप ह्या लांबच्या मार्गानें होईल असें इंग्लंडनें प्रसिद्ध केलें आहे. ह्यावरून बाल्कन्स, इटली इत्यादि बाजूंकडचें राजकारण कोणत्या प्रकारचें आहे ह्याची कल्पना येते.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर | **महिंद्रकर ब्रदर्स** तयार कपड्याचे व्यापारी | बुधवार चौक, पुणें

### दि इंडियन प्रोगेसिव्ह इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें

पुणें येथील दि इंडियन प्रोगेसिव्ह इन्शुअरन्स कंपनी लि., या कंपनीचा ता. ३१ डिसेंबर, १९३९ अखेर संपणाऱ्या चवथ्या वर्षाचा अहवाल आमचेकडे आला आहे. त्यावरून अहवालाचे सालीं कंपनीकडे एकूण रु. ३,४८,४७५ चे नवीन विमाअर्ज आले असून त्यांपैकीं कंपनीनें रु. ३,१५,७२५ इतक्या रकमेच्या पॉलिसी दिल्या आहेत. अहवालाचे सालीं कंपनीचें एकूण उत्पन्न सुमारें रु. ५४,८९९ इतकें झालें. त्यांतून व्यवस्थापकीय खर्च, दिलेलें व्याज, मोटार व इतर सामानावरील घसारा व रु. १५०० ची क्लेमकरितां तरतूद व रु. ५७६२ आ. १५ ची सरकारी कर्जरोख्यावरील घसाऱ्यासाठीं निर्माण केलेल्या इन्व्हेस्टमेन्ट फ्लक्च्युएशनची रक्कम वजा जातां कंपनीनें सुमारें रु. १७,५९१ इतक्या रकमेची आयुर्विमानिधींत भर टाकली आहे. त्यामुळें अहवालाचे सालअखेर कंपनीच्या आयुर्विमानिधी सुमारें रु. ४२,०७२ इतका झाला आहे. कंपनीचे अहवालांत नमूद केलेल्या आकड्यांवरून विद्यमान जागतिक आर्थिक मंदीचा काळ, विमाधंद्यांतील चालू स्पर्धा व महायुद्धामुळें झालेली महर्गता हीं लक्षांत घेता कंपनीनें दाखविलेली प्रगति निःसंशय समाधानकारक आहे.

अहवालाचे सालीं कंपनीचा आयुर्विमानिधी गेल्या सालापेक्षां सुमारें शेकडा ७२ टक्क्यांनीं वाढला आहे. कंपनीचे एकूण विम्याच्या कामापैकीं विमे रद्द होण्याचें प्रमाण अवघें १६ टक्के पडलें आहे व मृत्यूमुळें क्लेम्सहि २ च आले आहेत. एकूण हप्त्याच्या उत्पन्नाशीं व्यवस्था खर्चाचें प्रमाण शेकडा ५१·८७ इतकें पडलें आहे. कंपनीचा व्यवहार अत्यंत काटकसरीचा असून विमेदारांची निवड चांगल्या दर्जाची असावी, असें दिसतें. कंपनीचे ताळेबंदावरून पाहतां असें दिसतें कीं, कंपनीनें रु. ५५,१९० इतकें शेअरविक्रीनें रोख भांडवल गोळा केलें आहे. अहवालाचें सालअखेर कंपनीची एकूण जिंदगी सुमारें एक लक्ष चाळीस हजाराची आहे. त्यांपैकीं कंपनीनें सरकारी कर्जरोखे, डिबेन्चर्स, घराचे तारणावर, विमेदाराचे पॉलिसीवर कर्ज वगैरे विश्वस्त सुरक्षित व फायदेशीर तारणांत सुमारें रु. १,१२,८४० इतकी रक्कम गुंतविली आहे. कंपनीनें नवीन विमा कायद्याच्या सर्व अटी पूर्ण केल्या असून रु. ९२००० चे दर्शनी किंमतीचें सरकारी कर्जरोखे रिझर्व्ह बँकेंत डिपॉझिट म्हणून ठेविले आहेत. कंपनीनें दाखविलेली ही समाधानकारक प्रगति पाहता नवीन विमाकायद्याखालीं सदर कंपनीचें अस्तित्व स्वतंत्रपणें खात्रीनें कायम राहील, इतका आर्थिक दर्जा अल्पावधींत निर्माण झाला आहे. कंपनीचा कारभार विमेदारांना फायदेशीर व लोकांचा विश्वास संपादन करणारा झाला आहे. कंपनीचे संचालक मंडळींत रावबहादूर हणमंतराम रामनाथ, श्री. हरीभाऊ घारपुरे, आय. सी. एस., ले. कर्नल के. जी. घारपुरे, आय. एम. एस., रावसाहेब गुप्ते, श्री. काकासाहेब रानडे, वैद्य नानल, प्रिंसिपॉल अण्णासाहेब जोग, प्रो. नारळकर, व श्री. बाबूराव साळवेकर, ही मंडळी आहेत. कंपनीस श्री. अनंतराव गाडगीळ व श्री. वासुदेवराव कलंत्रे, हे खटपटी व उत्साही चिटणीस लाभल्यामुळें विद्यमान जागतिक आर्थिक मंदीचे व या धंद्यांतील चढाओढीचे काळांत तिला एवढी प्रगति दाखवितां आली, ही गोष्ट खरोखरच प्रशंसनीय आहे. या कंपनीस भरपूर लोकाश्रय मिळो व कंपनीची उत्तरोत्तर भरभराट होवो, असें आम्ही मनःपूर्वक इच्छितों.

### बँक ऑफ महाराष्ट्राची नवीन शाखा

बँक ऑफ महाराष्ट्र लि. या बँकेच्या अनेक हितचिंतक व खातेदार यांच्या सूचनेनुसार डेकन जिमखाना पोस्ट ऑफिसचे पिछाडीला श्री. टी. व्ही. रानडे कॉन्ट्रॅक्टर यांच्या बंगल्यांत सदर बँकेची शाखा गुरुवार ता. ९ मे या दिवसापासून सुरू करण्यांत येणार आहे.

### आरोग्यमंडळ, पुणें

#### रौप्यमहोत्सव–स्मृतिग्रंथ

पुणें येथील आरोग्यमंडळाचा रौप्यमहोत्सव नुकताच साजरा करण्यांत आला. त्यानिमित्तानें आपल्या पंचवीस वर्षांच्या आयुष्यांतील कार्याचें दिग्दर्शन करण्यासाठीं मंडळानें सचित्र वृत्तांत प्रसिद्ध केला आहे, त्याची एक प्रत आमच्याकडे आली आहे. पुण्यांतील अनेक स्वार्थत्यागी व लोकहितैषी नागरिकांच्या सहकार्यानें मंडळानें शहराचें आरोग्य सुधारण्याचें आणि जनतेंत त्या संबंधांत जागृति उत्पन्न करण्याचें उत्कृष्ट कार्य केलें आहे. आरोग्यमंडळासारख्या संस्थेस लोकांची सहानुभूति आणि द्रव्यसहाय ह्यांची आवश्यकता अर्थातच असणार. त्यास ह्या प्रकारचें पाठबळ मिळून मंडळाच्या हातून उत्तरोत्तर अधिक भरीव कामगिरी होत जाईल अशी आम्हांस आशा आहे.

उदयोन्मुख विमा कंपनीची प्रशंसनीय प्रगति !!

**दी इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कं. लि.**

**हेड ऑफिसः—पुणें शहर.**

■ (१) अत्यंत विकट परिस्थितींत समाधानकारक नवीन काम. ■ (२) अवघ्या ४ वर्षांत रु. ४२०००चे वर लाईफ फंड. ■ (३) विमेदारास अत्यल्प हप्त्यांत भरपूर सवलती. ■ (४) वजनदार संचालक मंडळ व कार्यकुशल व्यवस्था.

अवास्तव गाजावाजा न करितां यशस्वी रीतीनें चालविलेल्या या विमा कंपनीची पॉलिसी व एजन्सी निश्चित फायदेशीर आहे.

सविस्तर माहिती तावडतोब मागवा. सेक्रेटरीज्

अ. ना. गाडगीळ.

वा. ना. कलंत्रे, बी. ए.

## मुंबई प्रांताचें आरोग्य

मुंबई प्रांताच्या सार्वजनिक आरोग्याविषयींचा १९३८ बाबतचा सरकारी वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे, त्यांतून खाली दिलेली माहिती घेतली आहेः—

या वर्षात एकूण ७,५८,४९५ जन्म झाले. सन १९३७ च्या संख्येपेक्षा २९,०१९ जन्म अधिक झाले आहेत. सन १९३७ ची मृत्युसंख्या (४,९३,२०८) व तसेंच मागील पांच वर्षांची सरासरी मृत्युसंख्या (४,९८,६०३) या दोन्ही संख्या पहातां रिपोर्टाच्या वर्षात झालेल्या मृत्यूंची संख्या वाढलेली असून ती (५,४७,३८७) इतकी आहे. प्रांताची सध्याची अंदाजें लोकसंख्या १,९६,५५,४६५ इतकी आहे तर तीच सन १९३१ च्या खानेसुमारींत १,७९,६७,०५० इतकी होती. खानेसुमारीप्रमाणें हिशोब करतां या वर्षाचें मृत्यूचें प्रमाण ३०.४७ पडतें व अंदाज केल्याप्रमाणेंच्या एकूण लोकसंख्येप्रमाणें हिशोब करतां तें २७.२८ इतकें पडतें.

रिपोर्टाचें वर्ष व मागील वर्ष यांच्याकडे तुलनात्मक दृष्टीनें पहातां असें दिसून येतें कीं, फक्त कॉलेरा व प्लेग हे दोन सांथीचे रोग सोडून इतर सर्व मृत्यूच्या कारणांच्या सदरांत वाढ झाल्याचें आढळतें. देवी येऊन झालेल्या मृत्युसंख्येंत २,५४५ इतकी, तापामुळें झालेल्या मृत्युसंख्येंत २२,२३३ इतकी, अमांश व अतिसार यांमुळें झालेल्या मृत्युसंख्येंत ६,१४८, श्वासोच्छ्वासविषयक रोगामुळें झालेल्या मृत्युसंख्येंत १४,१३१, इतर कारणांमुळें झालेल्या मृत्युसंख्येंत १५,६८८ इतकी व दुखापती वगैरेमुळें मृत्युसंख्येंत ७१३ इतकी वाढ झाली आहे. कॉलऱ्यामुळें झालेल्या मृत्युसंख्येंत ७,२८९ इतकी व प्लेगमुळें झालेल्या मृत्युसंख्येंत १०० इतकी घट झाली आहे.

निरनिराळ्या सदरांतील मृत्युसंख्येची मागील पांच वर्षांच्या १९३३ तें १९३७ सरासरी मृत्युसंख्यांशीं तुलना करतां, सांथीच्या सर्व रोगांपासून झालेली मृत्युसंख्या कमी झाल्याचें दिसून येतें. तथापि इकडे ही झालेली घट ताप, अमांश व अतिसार, श्वासोच्छ्वासविषयक रोग, इतर कारणें व दुखापती यामुळें झालेल्या मृत्युसंख्येंतील वाढीनें भरून निघून उलट एकूण मृत्युसंख्या ज्यास्तच झाली.

सांथीचे रोग कमी झाले असतां सुद्धां मृत्यूचें प्रमाण वाढलें आहे या गोष्टीवरून फिरून असें दिसून येतें कीं हल्लीं मृत्युसंख्येच्या प्रमाणांत सांथीच्या रोगामुळें अगदींच थोडा फेरफार होतो. या प्रांतांत झालेल्या एकूण मृत्युसंख्येपैकी शेकडा ९० इतकी मृत्युसंख्या "ताप", "श्वासोच्छ्वासविषयक रोग" व "इतर कारणें" या तीन सर्वव्यापी सदराखाली येते. या वर्षात एन्फ्लुएंझा व गोंवर या दोन रोगामुळें बरेच मृत्यू झाले. या रोगासंबंधींची नोंदणी सदोष असल्यामुळें ते रोग कोणत्या प्रमाणांत चालू आहेत याबद्दल त्यावरून बिनचूक कल्पना येत नाहीं, तथापि एवढी गोष्ट मात्र निर्विवाद आहे कीं या रोगामुळें झालेले मृत्यु तसेंच क्षयामुळें झालेले मृत्यु यांच्या योगानें "ताप" व "श्वासोच्छ्वासविषयक रोग" यांच्या एकूण मृत्युसंख्येंत व प्रमाणांत वाढ झाली आहे. बहुजनसमाजाचा राहणीचा दर्जा अगदींच कनिष्ठ आहे व त्यामुळें साधारणतः लोकांची ताकत कमी होते व त्यामुळें जे रोग अधिक चांगल्या राहणीच्या पद्धतीनें टाळण्यासारखे असतात अशा रोगांना ते लोक सहजासहजीं बळी पडतात. शिक्षणाचा अभाव व आरोग्यासंबंधींच्या तत्त्वांविषयीं बेफिकीरी या दोन कारणांमुळें हा प्रश्न अधिकच बिकट झाला आहे. कफक्षय व श्वासोच्छ्वास विषयक रोगांत हळुहळु वाढ होत आहे ही गोष्ट पूर्वीच वारंवार जोरानें निदर्शनास आणून देण्यांत आली आहे. ह्या रोगाचा फैलाव शहरांतून खेडोंपाडीं होऊं लागला आहे व म्हणून ज्यांतून ह्या रोगाचा प्रसार होतो अशा, विशेषतः उद्योगधंद्यांच्या शहरांत, ह्या रोगाचा प्रतिबंध करण्याची योजना अधिक मोठ्या प्रमाणांत करणें आवश्य आहे हें उघड आहे. लोकांनीं सरकारी व स्थानिक अधिकारी मंडळांच्या दवाखान्यांचा व इस्पितळांचा अधिक फायदा घेणें जरूर आहे. प्रांतांतील सिव्हिल इस्पितळांत क्षयरोगविभाग उघडण्यांत आल्यामुळें क्षयरोग्यांचा शोध लावण्यास, तसेंच ह्या रोगाच्या प्रसारास प्रतिबंध करण्यास बरीच मदत होईल अशी आशा वाटते.

तसेंच सन १९३७ मध्यें अर्भकांची मृत्युसंख्या १,१७,२५८ इतकी होती, ती वाढून सन १९३८ सालीं १,३२,१०० इतकी झाली, ही गोष्टहि तितकीच भयसूचक आहे. ह्या वर्षी या प्रांतांत गोंवराचा आजार चालू असल्यामुळें अर्भकांच्या मृत्युसंख्येंत विशेष भर पडली आहे. या अर्भकांच्या मृत्युसंख्येंत देवीच्या रोगामुळें झालेल्या मृत्यूंची संख्यासुद्धां बरीच आहे. हे दोन्ही रोग अनारोग्यकारक अशा मार्गांत फार फैलावतात; परंतु चांगल्या संवयी व योग्य सावधगिरी या उपायांनीं त्यांचा फैलाव कमी करतां येणें शक्य आहे. यांपैकी दुसऱ्या रोगांवर (देवींवर) देवी टोंचून घेणें हा रामबाण उपाय आहे. प्रांतांत जन्माचें प्रमाण मोठें आहे ही गोष्ट अर्भकांच्या मृत्यूच्या व मातांच्या मृत्यूच्या मोठ्या प्रमाणाचें कांहीं अंशीं कारण आहे. १५ ते ३० वर्षे दरम्यानच्या वयाच्या स्त्रियांतील मृत्यूचें प्रमाण त्याच वयाच्या पुरुषांच्या मृत्यूच्या प्रमाणापेक्षा अधिक आहे ही गोष्टहि अर्थसूचक आहे; परंतु याचें कारण गर्भधारणा कीं क्षयरोग आहे यांविषयीं अधिक चौकशी होणें जरूर आहे.

मुंबई प्रांतांत नोंदण्यांत आलेली मृत्यूच्या प्रमाणांतील वाढ ही बंगाल, आसाम, ब्रह्मदेश, बिहार, ओरिसा, पंजाब, मध्यप्रांत, संयुक्तप्रांत, व सरहद्द प्रांत यांतसुद्धां दिसून येते; मद्रास प्रांतांत किंचित् व सिंध प्रांतांत बरीच घट दिसून येते.

या वर्षी प्रांतांतील जन्माचें प्रमाण ४२.२२ होतें परंतु तेंच सन १९३७ मध्यें ४०.९८ होतें. अर्भकांच्या मृत्यूच्या मोठ्या प्रमाणाच्या अनेक कारणांपैकी मोठें जन्माचें प्रमाण हें एक मुख्य कारण असून शिवाय त्यामुळें मातांचें आरोग्य बिघडतें व पित्यांचा पैसा खर्च होतो. सालोसाल कमजास्त होत जाणाऱ्या व हल्लींप्रमाणें जन्ममृत्यूंच्या इतर आकडेवारींत विघातक परिणाम घडविणाऱ्या अशा जन्माच्या मोठ्या प्रमाणाऐवजीं प्रांताच्या आर्थिक परिस्थितीशीं सुसंगत होईल असें स्थिर जन्मप्रमाण असणें इष्ट आहे.

एन्टेरिक फीव्हरमुळें (आंत्रज्वरामुळें) या वर्षात ५,५८७ मृत्यू झाले तर सन १९३७ मध्यें ६,१०५ मृत्यू झाले होते. मुंबई शहर, पुणे, सोलापूर, सुरत, नाशिक, अहमदाबाद, धारवाड, जळगांव, मालेगांव, बेळगांव, कल्याण, नंदुरबार व बोर्डी या सदरांत या तापामुळें झालेल्या मृत्यूचें प्रमाण मोठें होतें.

---

## तडवळें को. क्रे. सोसायटी

### नवीन बांधलेल्या ऑफिसचा उद्घाटन समारंभ

कसबे तडवळें, ता. बार्शी, येथील को. क्रे. सोसायटीनें नवीन बांधलेल्या ऑफिसच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ ता.२८।४।४० रोजीं श्री. आर. एस. पाटील बी. एजी., अ. रजिस्ट्रार आणि रू. डे. ऑफिसर, सोलापूर, यांचे हस्तें मोठ्या थाटानें साजरा झाला. ईशस्तवन व स्वागतपर पद्यानंतर सोसायटीचे सेक्रेटरी श्री. बाबुराव देशपांडे, यांनीं सोसायटी स्थापन झालेपासून तो आतांपर्यंतचा इतिहास थोडक्यांत निवेदन केला. श्री. पाटील यांचें हस्तें उद्घाटन होऊन इमारत वगैरे पहाण्यांत आली. इमारत वगैरें पहाणें झाल्यावर समारंभास साजेसें श्री. पाटील यांनीं भाषण करून सोसायट्यांपासून शेतकरी वर्गास कसा फायदा आहे हें अगदीं सोप्या भाषेंत विशद करून सांगितलें.

नंतर चेअरमन रा. कु. महाजन यांचे हस्ते अध्यक्षांस हारतुरे अत्तर गुलाब वगैरे अर्पण होऊन हा समारंभ आटोपण्यांत आला.

सदर सोसायटी १९०५ सालीं स्थापन झाली असून तिचा मुंबई इलाख्यांत ६ वा नंबर आहे. सद्यःस्थितींत सोसायटीचें खेळतें भांडवल साडेतेवीस हजारांवर असून कर्जाचा व्याजाचा दर द. द. शेंकडा ७॥१३ रु. आहे. रिझर्व फंड सतरा हजार नऊशेवर असून सोसायटीस बाहेरील कर्ज कोणाचेंहि नाहीं.

---

## होळकर स्टेट सहकारी परिषद

इंदूर को· सेंट्रल असोसिएशनच्या विद्यमानें वरील परिषद इंदूर येथें २७ व २८ एप्रिल रोजीं दि. ब. सी. एम. गांधी यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. रा. ब. कर्नल दिनानाथ, इंदूरचे मुख्य प्रधान यांनीं परिषदेचें उद्घाटन केलें. परिषदेमध्यें खेडेगांवांच्या आर्थिक सुधारणेच्या प्रश्नास विशेष महत्त्व देण्यांत आलें होतें.

---

## युद्धांतील आरोग्यविषयक कार्य

युद्धमान राष्ट्रांना सर्व प्रकारची आरोग्यविषयक मदत देण्याचें राष्ट्रसंघानें ठरवलें असून औषधें पुरवणें, शांतताप्रेमी लोकांना परदेशांत पोंचविणें, साथींचा प्रादुर्भाव होणार नाहीं अशी खबरदारी घेणें; वरील कामासाठी इतर क्षेत्रांत शत्रु असले तरी त्यांना एकत्र आणून त्यांचें सहकार्यक्षेत्र वृद्धिंगत करणें, त्या त्या विशिष्ट राष्ट्राच्या परिस्थितीचा अभ्यास करणें वगैरे स्वरूपाचें काम चालू आहे. याच संधीचा फायदा घेऊन सर्वत्र सारखीं औषधें ठरवण्यासंबंधीं पूर्वी जे प्रयत्न चालू होते ते पुनः जोरानें सुरू केले आहेत. या विषयासंबंधीं समग्र माहिती आरोग्यविषयक द्वैमासिकाच्या ताज्या अंकांत विस्तृतपणें दिली आहे.

## नवीन ग्रंथ

राष्ट्रसंघातर्फे जे नवीन ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आले आहेत त्यांत खेडेगांवांतील व शहरांतील घरें, दळणवळणाची सुलभता, आंतरराष्ट्रीय व्यापार, कच्चा माल, आहार, खेडेगांवांतील आरोग्य वगैरे विविध विषय आहेत. या सर्व पुस्तकांत नेहमींप्रमाणें निरनिराळ्या राष्ट्रांतील सद्यःस्थिति व नवीन संशोधनाची माहिती आढळते. खेडेगांवांसंबंधीं गतवर्षी युरोपमध्यें एक परिषद होणार होती, परंतु युद्धामुळें ती परिषद जरी होऊं शकली नाहीं तरी त्यानिमित्त जें विविध वाङ्मय निर्माण करण्यांत आलें आहे त्यामुळें युरोपमधील प्रत्येक राष्ट्राची सद्यःस्थिति, आरोग्य, आहार, घरबांधणी, करमणूक, शेती, लोकवस्ती, जमिनी, समाजव्यवस्था, बौद्धिक दर्जा, आर्थिक स्थिति वगैरे नांवाखालीं समजते. युरोप व आशिया खंडांचें हवामान व इतर फरक असला तरी तिकडील अनेक सुधारणा इकडे अमलांत आणणें शक्य आहे असें हे ग्रंथ वाचले असतां आढळून येतें. हिंदुस्थान कृषिप्रधान राष्ट्र असल्यानें हिंदी जनतेला हा विषय जिव्हाळ्याचा वाटणें स्वाभाविक आहे.


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर |
| --- | --- | --- |
| रु. ५४ | | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा. —

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे

★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

| रजिस्टर्ड ऑफिस : | बिझिनेस ऑफिस : |
| --- | --- |
| ७५४ शुक्रवार, पुणें २ | ११२A सदाशिव, पुणें २ |

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.




स्त्रियांचे रोगांवर हमखास गुणकारी.

स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज-सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) 3%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—३ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... ... ... | १०१—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०६—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९४—१४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—१३ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४—१२ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०५—० |
| ५% म्हेसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | १११—४ |
| ५% म्हेसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२१—८ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००—५० ) ११% ... ... | १३९—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०२—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३६—१२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५४७—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १३४—४ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३५५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५४६—४ |

#### रेल्वेज.

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| पाचोरा—जामनेर ( १०० ) २% ... ... | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) १२½% | ९९२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २२६—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४९—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०–१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८–१४ |
| ओरिएंटल विमा ( १०० ) १९५ रु. ... | ४३८०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०८–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. ९ आ. ... | १४८—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ४१६—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै... | २२८२—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | १९५–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( पिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२—७—६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१–१४—६ |


# पूर्व खानदेश
# सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
जळगांव.

( स्थापना : मे १९१६ ) रु.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल....... | ४,६९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।– |
| इतर फंडस्. ...... | ३,७७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के ( सहा वर्षांपासून )

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



# बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

☞ किं. १ रु. ८ आणे ☜

१ रु. १० आ. ६ पै ची तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

" अर्थ " ग्रन्थमाला, : : पुणें ४.




एजंटः—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडेमी**, ६७२ सदाशिव, पुणें.

—ॐ सत्यमेवजयते—

सुकामेवा एक आणा पाऊंड

# लोणच्याचें साहित्य

म्हणजे

निवडक सर्व किराणा

मोहरीची डाळ, मोहरी भुकणी, मोहरी तेल ( पॅक बाटल्या ), मेथी भरडा, स्पेशल हिंग,
तांबडें लाल ( भडक ) तिखट भुकणी इत्यादि खात्रीचा माल तयार आहे.

लोणच्याचा तयार मसाला पूड तयार आहे !

## —: दत्तात्रय नारायण हेर्जीब :—

किराणा व सुकामेवा व्यापारी, २० शुक्रवार पेठ, पुणें २
लोणचीं, पापड, मसाले, मेतकूट सदैव तयार असतात.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

Examiner Press Building, Dalal Street, Bombay
716 Sadashiv Peth, Poona City

**K. K. & Co.**

Photographic Dealers
POONA.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## " अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

*   *   *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

---

मुंबई प्रान्ताच्या शाळाखात्यानें लायब्ररीसाठी मंजूर केलेलें व असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब यांनीं शिफारस केलेलें पुस्तक.

## फर्म, कंपनी, सोसायटीचा कायदा

( लेखक:—श्री. के. बा. गजेन्द्रगडकर, बी. ए. ऑनर्स, ) एलएल. बी. वकील.

या पुस्तकांतील कायद्यासंबंधीं विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला धरून आहे. तिकिटरूपानें ०६ पाठवून एक प्रत संग्रही ठेवा.

तसेंच शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठी मुंबई सरकारनें नवीनच पास केलेला

## — शेतकरी ऋणविमोचन कायदा —

मराठी भाषेंत छापत आहे. १ रु. पाठवून नांव नोंदवा मागाहून किंमत जास्त पडेल. तरी आजच ऑर्डर द्या.

पत्ता मॅनेजर, सेन्ट्रल लॉ हाऊस.
टिळक रोड, नागपूर शहर.

---

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprise, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**
**Last year 1937-38**
**Exceeds**
**Rs. 3 CRORES**

**BONUS**
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( Estd. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth

---

## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात. केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

**वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये**

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.
व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.

---

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

---

## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें १००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ११४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.